भवन रचना कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. :-भवन/३४६
दिनांक :- २९/४/२०१८

मा.उप आयुक्त,
(सामान्य प्रशासन) विभाग,
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस. . . .

विषय :- नागरिकांची सनद अद्ययावत करणेबाबत.

नागरिकांची सनदमध्ये अंतर्गत योग्य ते बदल करुन अद्ययावत करणेत येत आहे. शनिवारवाडा व्यासपीठ व पटांगण व लाल महाल हॉल हा भवन रचना विभाग पुणे महानगरपालिकेतर्फे सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन देण्यात येतो. सदर सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम विनामुल्य व सर्व नागरिकांसाठी खुला असल्यास र.रु.२५००/- प्रति दिन व तिकीट विक्री असल्यास र.रु.७५००/- प्रति दिन तसेच चित्रीकरणासाठी र.रू.१०,०००/- याप्रमाणे भाडे आकारुन शनिवारवाडा पटांगण व व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात येते. सदरचे भाडे नॅशनल कल्चर फंड या नावे फक्त डिमांड ड्राप्ट द्वारे जमा करून घेण्यात येते. तसेच सदरच्या सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमासाठी पोलिस खात्याची तसेच भारतीय पुरातन सर्व्हेक्षण खात्याची परवानगी व अभिप्राय मागविण्यात येते. तद्नंतर शनिवारवाडा पटांगण व व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात येते. लाल महाल हा सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमासाठी विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येतो

मा.स.कळावे,

कार्यकारी अभियंता (भवन)
पुणे महानगरपालिका